# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला,
४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व ),मुंबई -४०० ०५१.

दू.क्र: ०२२-६२५४२१००
ई.मेल: secretary @ msbte.com
संकेतस्थळ:www.msbte.org.in

जा.क्र.मरातंशिमं/का.४२/हि.प. २०२२/ ४२९ दिनांक 23 DEC 2022

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नित सर्व तंत्रनिकेतने
(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्य पदविका अभ्यासक्रम)

**विषय:-** मंडळाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षण व परीक्षा योजने (Teaching Examination Scheme) नुसार online परीक्षा असलेल्या विषयांची हिवाळी परीक्षा २०२२ च्या अंतिम परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत.

**संदर्भ:-** जा.क्र.मरातंशिमं/का.४२/हि.प. २०२२/४१७ दिनांक-१९ डिसेंबर, २०२२.

उपरोक्त संदर्भानुसार पदविका अभ्यासक्रमाच्या Teaching Examination Scheme नुसार online परीक्षा असलेल्या विषयांची हिवाळी २०२२ परीक्षेचे वेळापत्रक व कार्यपध्दती सुचित करण्यात आले होते. **सदर परिपत्रकास अनुसरून महाराष्ट्रातील अनेक तंत्रनिकेतनातून विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यानंतर Online परीक्षेसाठी तयारी करण्याकरीता वेळ मिळत नसल्याने online परीक्षा मंडळाची लेखी परीक्षा संपल्यानंतर घेण्यासाठी विनंती केली होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता मंडळातर्फे वेळापत्रकात खालील बदल करण्यात येत आहे.**

| Date | Session | Time Slot | Paper code | Time Duration |
|---|---|---|---|---|
| 27-Jan-23 | Morning | 10.00 AM TO 01.00 PM | 17401 | As per Teaching Examination Scheme |
| | | | 17625 | |
| | | | 17944 | |
| | | | 22106 | |
| | | | 22211 | |
| | | | 22248 | |
| | | | 22378 | |
| | | | 22517 | |
| | | | 22603 | |
| | | | 22628 | |
| | | | 22636 | |
| | | | 22652 | |
| | | | 24305 | |
| | Afternoon | 02.00 PM TO 05.00 PM | 22343 | |
| | | | 22618 | |
| 28-Jan-23 | Morning | 10.00 AM TO 01.00 PM | 22105 | |
| | | | 22202 | |
| | | | 22249 | |
| | | | 22379 | |
| | Afternoon | 02.00 PM TO 05.00 PM | 22509 | |
| 30-Jan-23 | Morning | 09.30 AM TO 12.30 PM | 22102 (ME,CE,EE) | |
| | Noon | 11.30 AM TO 02.30 PM | 22102 (All other courses) | |
| | Afternoon | 02.00 PM TO 05.00 PM | 22447 | |

online हिवाळी परीक्षा २०२२ परीक्षेसंदर्भात विभागीय कार्यालय, बाह्य परीक्षक, संस्था, पर्यवेक्षक व संबंधित विद्यार्थी यांच्या तर्फे राबवावी लागणारी सविस्तर कार्य पध्दती खालीलप्रमाणे आहे:

१. विभागीय कार्यालय स्तरावरील कार्यप्रणाली.

अ. विभागीय कार्यालयाने Online परीक्षा व्यवस्थित रीत्या पार पाडण्यासाठी प्रत्येक संस्थेला प्रत्येकी एक बाह्य परीक्षक (Observer) नेमावा.

आ. सदर बाह्य परीक्षकांस Online परीक्षा कार्यपध्दतीची संपूर्ण माहिती असल्याची खात्री करुन घ्यावी.

२. संस्थास्तरावरील कार्यप्रणाली.

अ. दिनांक **२१.०१.२०२३** रोजी मंडळाच्या संकेतस्थळावरील Online Activities या सदराखाली MSBTE Theory Exam Link वर संस्थेच्या Academic Monitoring Login मध्ये हिवाळी परीक्षा २०२२ साठी बसणा-या विद्यार्थ्यांची Online Examination ची Link, User ID व Password उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर User ID व Password संबंधित विद्यार्थ्यांना पुरविण्याची कार्यवाही संस्थेने पूर्ण करावी.

आ. सदर परीक्षेसाठी बसणा-या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम निहाय व विषय निहाय Block Arrangement दिनांक **२१.०१.२०२३** रोजी संस्थेच्या Login मध्ये दर्शविण्यात येईल. त्याप्रमाणे Block तयार करुन विद्यार्थ्यांना परीक्षेस बसविण्याची व्यवस्था करावी.

इ. परीक्षा सुरु होण्याच्या १ तास आधी Institute Login मधील Block Arrangement मध्येच सर्व विद्यार्थ्यांचे Test Code उपलब्ध करुन देण्यात येतील. Test Code सह असलेल्या Block Arrangement ची Print काढून सदर Print परीक्षेसाठी Attendance Sheet म्हणून वापरण्यासाठी संबंधीत पर्यवेक्षकाला देण्यात यावी.

ई. दिनांक **२१.०१.२०२३** रोजी संस्थेच्या Login मध्ये अभ्यासक्रम / विषय निहाय तसेच परीक्षा दिनांक व Slot निहाय लागणा-या पर्यवेक्षकांची संख्या (Invigilator) उपलब्ध करुन देण्यात येतील.

उ. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना परीक्षा Slot च्या १५ मिनिटे आधी उपस्थित करून घ्यावे व सदर विद्यार्थ्यांना त्यांच्या Block नुसार बसवून घेण्याची व्यवस्था करावी.

ऊ. प्रत्येक Block वर नेमण्यात आलेल्या पर्यवेक्षकांना (Invigilator) Test Code असलेली Block Attendance Sheet पुरवून Block वर पर्यवेक्षाणासाठी पाठविण्यात यावे.

३. संस्थेतर्फे नेमण्यात आलेल्या पर्यवेक्षकाची (Invigilator) कार्यप्रणाली .

अ. पर्यवेक्षणासाठी लागणारी Test Code असलेली Block Attendance Sheet संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी.

आ. परीक्षा सुरू होण्याच्या २० मिनिटे आधी परीक्षा Block मध्ये हजर राहावे.

इ. परीक्षेसाठी Block मध्ये उपस्थितीत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांची Enrollment No. प्रमाणे उपस्थिती Block Attendance Sheet वर नोंद करावी. उपस्थिती नोंदविल्यानंतर Block Attendance Sheet वर उपलब्ध असणारा Test code संबंधित विद्यार्थ्यांस पुरवावा.

ई. परीक्षेच्या वेळी परीक्षार्थी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी सक्षमपणे पर्यवेक्षण करावे.

उ. विभागीय कार्यालयाकडून नेमलेल्या बाह्य परीक्षकाला सहकार्य करुन परीक्षा मुक्त व न्याय वातावरणात पार पाडावी.

४. विद्यार्थी स्तरावरील कार्यप्रणाली.

अ. दिनांक **२१.०१.२०२३** रोजी संस्थेतील संबंधित विभागाकडून हिवाळी २०२२ अंतिम परीक्षेसाठीची Online Examination Link, User ID व Password प्राप्त करुन घ्यावे.

आ. हिवाळी २०२२ अंतिम परीक्षेसाठी वेळापत्रकात उल्लेख केलेल्या वेळेपेक्षा १५ मिनिटे आधी नियोजित परीक्षा Block मध्ये हजर राहावे.

इ. परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांने संस्थेचे ओळखपत्र व Hall Ticket सोबत बाळगणे बंधनकारक राहील.

ई. परीक्षा Block मधील पर्यवेक्षकांकडे परीक्षेसाठीची उपस्थिती नोंद करुन Test Code घ्यावा.

उ. हिवाळी २०२२ अंतिम परीक्षेसाठी वापरावयाच्या Camera Enabled Smart Phone / Laptop / Tab वरुन परीक्षेसाठी Login करावे व परीक्षेचा Slot सुरु झाल्यावर Test Code वापरून परीक्षा सुरू करावी.

ऊ. कोणताही गैरप्रकार न करता व्यवस्थितपणे परीक्षा online पध्दतीने पूर्ण करावी.

५. बाह्य परीक्षकाची कार्य व जबाबदारी.

अ. विभागीय कार्यालयाने नेमलेल्या बाह्य परीक्षकाने त्यास नेमून दिलेल्या संस्थेत परीक्षेदिवशी वेळापत्रकात उल्लेख केलेल्या वेळेपेक्षा ३० मिनिटे आधी हजर राहावे.

आ. बाह्य परीक्षकाने संस्थेने Online परीक्षेसाठी केलेली व्यवस्था / Block Arrangement योग्य असल्याची खातरजमा करावी.

इ. बाह्य परीक्षकाने परीक्षेच्या प्रत्येक Block मध्ये Attendance Sheet वरील नमूद हजर विद्यार्थी संख्या व परीक्षा कक्षात उपस्थित विद्यार्थी संख्या पडताळून पहावी. त्याच बरोबर हजर विद्यार्थ्यांचे ओळखपत्र व Hall Ticket तपासून पहावे.

सदर परिपत्रकातील सुधारीत वेळापत्रक सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शानास आणून देण्याची व्यवस्था करावी.

सर्व संबंधितांनी वरील कार्यप्रणालीचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रति,
उपसचिव (तां.) म. रा. तं. शि. मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.